शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
निर्णय क्रमांक–हिंभाप–1080/131–वीस मंत्रालय,मुंबई–400,032.
दिनांक :– 25 मे 1981.

संदर्भ:– शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक–हिभाप–1976–28,दि.10.6.1976

निर्णय – शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.हिभाप–1976–28–दि.10.6.1976 अन्वये शासकीय अधिका–यांनी/कर्मचा–यांनी एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्या विषयीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशांच्या संदर्भात वेळोवेळी शासनाकडे केलेल्या निरनिराळ्या सूचनांचा विचार करुन पुढील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :–

§1§ माध्यमिक शालांत परीक्षा, हिंदी हा विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना एतदर्थ मंडळाच्या हिंदीच्या निम्न व उच्च श्रेणी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येत आहे व पर्यायाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक–इएक्सएम–1663–न दिनांक 18/11/66 मधील आदेश या निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

§2§ हिंदी भाषेच्या प्रचाराचे काम करणा–या खाजगी संस्थातर्फे डिसेंबर 1966 नंतर आणि दिनांक 24/11/77 पूर्वीच्या कालावधीत घेतल्या गेलेल्या परीक्षांच्या दर्जा, एतदर्थ मंडळाच्या निम्न व उच्चस्तर परीक्षांच्या समकक्ष मानला जाण्याच्या प्रश्नावर विचार करण्यात आला असून या कालावधीत खाजगी संस्थांमार्फत घेण्यात आलेल्या अशा परीक्षांना समकक्ष म्हणून मान्यता देण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला आहे.

§3§ त्याचप्रमाणे इतर खाजगी संस्थामार्फत, तसेच इतर राज्यांच्या व केंद्र शासनाच्या इतर अभिकरणा §एजन्सी§ मार्फत घेण्यात येणा–या हिंदीच्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कर्मचा–यांच्या बाबतीत, त्यांना एतदर्थ मंडळाच्या हिंदीच्या समकक्ष परीक्षांतून सूट देण्यात यावी किंवा कसे याबाबत आता असा निर्णय घेण्यात आला आहे की,अशा कर्मचा–यांच्या बाबतीत कमीत कमी माध्यमिक शालांत परीक्षा हिंदी विषय घेऊन उत्तीर्ण होण्याची आवश्यकता हाच निकष लावावा. तसे नसल्यास अशा कर्मचा–यांनी एतदर्थ मंडळाचीच विहित परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,
रा.दा. रणदिवे,
शासनाचे उप सचिव.
सामान्य प्रशासन विभाग,

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,